साहित्य, कला, संशोधन व परिवर्तनवादी पुरोगामी
विचाराशी बांधिलकी ठेवणारे त्रैमासिक

# अक्षरगाथा

वर्ष : तेरावे । अंक : दुसरा । जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर २०२२, नांदेड

संपादक : मा. मा. जाधव

**संपादक मंडळ** : बजरंग बिहारी, अनिल जायभाये, विवेक घोटाळे, संतोष सुरडकर, कमलाकर चव्हाण

**कार्यकारी संपादक** : दिलीप चव्हाण, भगवान फाळके

**प्रकाशक** : अर्चना माधवराव जाधव
बळीवंश प्रकाशन, 'बळीवंश',
नृसिंह पॅलेसच्या मागे,
नरहरनगर, नांदेड –५.

**मुद्रिततपासणी** राजेश मुखेडकर.
भ्र. ९८९०१५३७००

**मुद्रक**
मुद्रा ऑफसेट प्रिंटर्स अँड प्रोसेसर्स
शारदा टॉकीजजवळ,
एम. जी. रोड, नांदेड–०३.

**मुखपृष्ठ व अक्षरमांडणी**
विजयकुमार चित्तरवाड

**अक्षरजुळणी**
गिरीश कहाळेकर
भ्र. ९८९०५९७७१४

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता**

मा. मा. जाधव
'बळीवंश', नृसिंह पॅलेसच्या मागे, नरहरनगर, नांदेड – ४३१ ६०५. भ्र. ९४२२८७४३३६, ९८८११९१५४३.
e-mail : akshargatha@gmail.com

**वार्षिक वर्गणी** : व्यक्ती : ₹ ३००/– संस्था : ₹ ४००/– **त्रैवार्षिक वर्गणी** : व्यक्ती : ₹ ८००/– संस्था : ₹ १०००/–
**१० वर्षासाठी** : व्यक्ती : ₹ २५००/– संस्था : ₹ ३०००/– **अंकाचे मूल्य** : ₹ १००/–

मनीऑर्डर/रोखीने/धनादेश/धनाकर्ष/Phone Pay/Google Pay 9422874336/बँक खाते : भारतीय स्टेट बँक (State Bank of India)
यशवंतनगर, नांदेड 'अक्षरगाथा' खाते नं. **32204333102** वर **IFSC Code : SBIN0001922**

वर्गणी रक्कम + ₹ ३० (शाखा विनिमय फीस) भरून पत्ता कळवावा.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी, या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच, असे नाही.

* या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

पृष्ठ क्र.३

**(मुखपृष्ठ व मलपृष्ठासह या अंकाची एकूण पृष्ठसंख्या १५६ आहे)**

साहित्य, कला, संशोधन व परिवर्तनवादी पुरोगामी
विचाराशी बांधिलकी ठेवणारे त्रैमासिक

# अक्षरगाथा

**वर्ष : तेरावे । अंक : दुसरा । जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर २०२२, नांदेड**

संपादक : **मा. मा. जाधव**

**संपादक मंडळ** : बजरंग बिहारी, अनिल जायभाये, विवेक घोटाळे, संतोष सुरडकर, कमलाकर चव्हाण

**कार्यकारी संपादक** : दिलीप चव्हाण, भगवान फाळके

**प्रकाशक** : अर्चना माधवराव जाधव
बळीवंश प्रकाशन, 'बळीवंश',
नृसिंह पॅलेसच्या मागे,
नरहरनगर, नांदेड –५.

**मुद्रिततपासणी** राजेश मुखेडकर
भ्र. ९८९०१५३७००

**मुद्रक**
मुद्रा ऑफसेट प्रिंटर्स अँड प्रोसेसर्स
शारदा टॉकीजजवळ,
एम. जी. रोड, नांदेड–०३.

**मुखपृष्ठ व अक्षरमांडणी**
विजयकुमार चित्तरवाड

**अक्षरजुळणी**
गिरीश कहाळेकर
भ्र. ९८९०५९७७१४

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता**

मा. मा. जाधव
'बळीवंश', नृसिंह पॅलेसच्या मागे, नरहरनगर, नांदेड – ४३१ ६०५. भ्र. ९४२२८७४३३६, ९८८११९१५४३.
e-mail : akshargatha@gmail.com

**वार्षिक वर्गणी** : व्यक्ती : ₹ ३००/- संस्था : ₹ ४००/- **त्रैवार्षिक वर्गणी** : व्यक्ती : ₹ ८००/- संस्था : ₹ १०००/-
**१० वर्षासाठी** : व्यक्ती : ₹ २५००/- संस्था : ₹ ३०००/- **अंकाचे मूल्य** : ₹ १००/-

मनीऑर्डर/रोखीने/धनादेश/धनाकर्ष/Phone Pay/Google Pay 9422874336/बँक खाते : भारतीय स्टेट बँक (State Bank of India) यशवंतनगर, नांदेड 'अक्षरगाथा' खाते नं. **32204333102** वर **IFSC Code : SBIN0001922**

वर्गणी रक्कम + ₹ ३० (शाखा विनिमय फीस) भरून पत्ता कळवावा.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी, या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच, असे नाही.

* या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



**(मुखपृष्ठ व मलपृष्ठासह या अंकाची एकूण पृष्ठसंख्या १५६ आहे)**

UGC CARE listed and Peer Reviewed Journal

४९

# अक्षरगाथा

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२२

## | अ नु क्र म |


**विभाग एक - ज्ञानदीप लावू जगी**

- आधुनिक मराठी साहित्य आणि संस्कृतीचा आदिपुरुष : म. फुले — नागनाथ कोत्तापल्ले — ५
- महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक सुधारणा... — जगदीश सोनवणे — २३

**विभाग दोन - तुका म्हणे झरा**

- **कविता** : देविदास कळसकर, भगवान निळे — २७
- नक्षत्रांचे देणे : अस्वस्थ आवृत्तीचे अक्षर लेणे — संतोष पवार — २९

**विभाग तीन - विशेष लेख**

- मुक्तिबोधांची कादंबरीत्रयीः मार्क्सवादी आकलन — जी.के. ऐनापुरे — ३८

**विभाग चार - सहावी विवेक जागर परिषद**

- आजचे समाजवास्तव आणि प्रसारमाध्यमांची भूमिका — अमेय तिरोडकर — ७६
- सामाजिक चळवळी आणि बुद्धिजीवींची भूमिका — दत्ता देसाई — ८२
- अब की बार रोजगार — अजित अभ्यंकर — ९३
- आर्थिक विषमता आणि बेरोजगारी — बी. युवराज — ९६
- लोकशाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य — असीम सरोदे — १०२
- भारतीय शेतीवास्तव व कृषिधोरणे — श्रीनिवास खांदेवाले — १०८

**विभाग पाच - भाष्य**

- महाराष्ट्राच्या भावी राजकारणात शिवसेनेचे भवितव्य ... — सचिन गरुड — ११३
- स्वातंत्र्योत्तर भारतातील आर्थिक स्थित्यंतरे — मारोती तेगमपुरे — १२६

**विभाग सहा - समीक्षा / पुस्तक परिक्षण**

- सम्यक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे ऊर्जादायी आत्मकथन 'भुरा' — मोना चिमोटे — १३२
- 'टिळा' : कृषीजनसंस्कृतीचा लेखाजोखा मांडणारा मूल्यनिष्ठ आविष्कार — योगेश महाले — १४१
- देशोधडी : भटक्या-विमुक्तांच्या अर्थविश्वाची उकल करणारे आत्मचरित्र — सुभाष भोसले — १५१

# महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक सुधारणा चळवळीतील योगदान

**डॉ. जगदीश छबुराव सोनवणे**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई.
ता. नेवासा, जि. अहमदनगर. भ्र. : ९४२३२१०२६० / ७२४९०२७१२५

वसाहतपूर्वकालीन भारतीय समाज हा पूर्णपणे मागा लेल्या अवस्थेत होता. या समाजात प्रचलित असणाऱ्या विषम सामाजिक रचना, सामाजिक-आर्थिक विषमता, अस्पृश्यता, लिंगभाव विषमता, अंधश्रद्धा आणि विविध प्रकारच्या अनिष्ट प्रथा, अन्याय, अत्याचार यामुळे ब्रिटिश राजवटीच्या आगमनापर्यंत भारतीय समाजाचे चित्र विद्रूप झालेले होते. ब्रिटिशांनी त्यांच्या प्रशासकीय सोयीसाठी इथे इंग्रजी शिक्षण सुरू केले. इंग्रजी शिक्षणामुळे नावशिक्षित भारतीय तरुणांना स्वातंत्र्य, समता, बंधुता, उदारमतवाद यासारख्या सार्वत्रिक कल्पनांचा परिचय झाला आणि त्यांनी काही प्रमाणात जुन्या संकल्पनांना फाटा दिला. सुशिक्षित लोकांनी समाजाच्या सामाजिक रचनेचे वास्तविक स्वरूप समजून घेतले आणि येथील प्रत्येक सामाजिक-आर्थिक व्यवहारामध्ये क्रूरता, अन्याय, विषमता दिसून आली. यामुळे मानवजातीच्या संपूर्ण विकासामध्ये हा महत्त्वाचा अडथळा असल्याचे त्यांच्या लक्षात आले. भारतात सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळीचे बीज यामुळे पेरले गेले. महात्मा ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून सुरू केलेला समतेचा देदीप्यमान लढा भारताच्या इतिहासातील एक सुवर्णपान म्हणून ओळखला जाते. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज आणि आर्य समाज यांनीही भारतातील सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत योगदान दिले. या संस्थांनी महाराष्ट्रात सामाजिक-धार्मिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांचा समावेश असलेल्या बहुविध सुधारणांमध्ये योगदान दिले. महात्मा फुले हे एक आद्य क्रांतिकारी समाजसुधारक होते, त्यांनी जातिव्यवस्था आणि तिला कारणीभूत असणारे विषमतामूलक धार्मिक ग्रंथ नाकारून ब्राह्मणी वर्चस्वाला आव्हान दिले. त्यांनी या पारंपारिक विषमतामूलक ब्राह्मणी संस्कृतीला नाकारून पर्यायी समतेवर आधारित अब्राह्मणी (ब्राह्मणेतर) संस्कृतीचे कार्यक्षम प्रारूप दिले. सत्यशोधक समाजाने लोकांना नवी उमेद दिली आणि त्यांना ब्राह्मणवादाच्या जोखडातून मुक्त केले.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्राने कोल्हापूर संस्थानामध्ये वेदोक्ताच्या प्रकरणावरून ब्राह्मण-ब्राहमणेतर दुफळी पाहिली. या वादाने ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांच्यातील दरी रुंदावत तिने विकृत वळण घेतले. त्यामुळे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात विविध प्रकारच्या सामाजिक-धार्मिक सुधारणा कायद्याने अमलात आणण्याचा धडाका लावला. अशा प्रकारे विसाव्या शतकाच्या प्रारंभीच महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीने तीव्र वळण घेतले आणि तिला ब्राह्मणेतर चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक नवीन दृष्टिकोन मांडून दलित आणि महिलांच्या मुक्तिप्रक्रियेला चालना दिली. उच्चशिक्षित, विवेकवादी, उदारमतवादी आणि मानवतावादी असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या प्रखर बुद्धिमत्तेचा यथायोग्य उपयोग करून मुक्तीच्या लढ्यामध्ये प्रसंगानुरूप

धोरणात्मक बदल करून दलित चळवळीचे नेतृत्व केले. त्यांनी एक वैचारिक लेखक, राजकीय नेता, पत्रकार, घटनाकार, कार्यकर्ता आणि प्रशासक, या विविध भूमिकांतून दलित चळवळीच्या सिद्धांत आणि व्यवहारात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

महर्षी विठ्ठल शिंदे यांनी आयुष्यभर अस्पृश्यतानिवारण आणि बहुजन समाजाच्या प्रबोधनाचे काम केले, ते सामाजिक-धार्मिक सुधारणांसाठी कार्यरत होते. त्यांनी दलितांच्या शिक्षणासाठी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' ची स्थापना केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रयत्नाने सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया गतिमान झाली. त्यांनी रयत शिक्षणसंस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनतेला जात, धर्म, लिंगभेद असा कोणताही भेदभाव न करता शिक्षण दिले आणि विद्यार्थ्यांमध्ये समानतेची भावना रुजविण्याचा प्रयत्न केला. संत गाडगेबाबांनीसुद्धा पोकळ अंधश्रद्धेवर हल्ला चढवला. त्यांनी संपूर्ण भारतभर प्रवास केला आणि आपल्या कीर्तनाद्वारे समता आणि स्वच्छतेचे महत्त्व लोकांना शिकवले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे दलितांच्या मुक्तीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानासाठी प्रसिद्ध आहेत. ते प्रार्थना समाजाशी संबंधित होते आणि त्याच्या मुंबई शाखेचे सचिव म्हणून काम करत होते. त्यांनी ऑक्सफर्डच्या मँचेस्टर कॉलेजमधून पदवी प्राप्त केली. त्यांनी १९०१ ते १९०३ या काळात तुलनात्मक धर्मांचा अभ्यास केला आणि परत आल्यावर प्रार्थना समाजात मिशनरी म्हणून सामील झाले. प्रार्थना समाजाच्या तत्त्वांचा प्रचार करण्यासाठी त्यांनी भारतभर प्रवास केला. संपूर्ण भारतभर फिरल्यानंतर त्यांनी अस्पृश्यांच्या दयनीय स्थितीचे अवलोकन केले होते, त्यांना दलितांच्या दुःखाची जाणीव झाली होती. त्यामुळे दलितांच्या मुक्तीसाठी काम करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी दलितांच्या उन्नतीसाठी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' अथवा 'भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळी' ही संस्था १६ ऑक्टोबर १९०६ रोजी स्थापन केली.१९०६मध्ये मुंबई येथे 'सोशल रिफॉर्म असोसिएशन' पुढे त्यांनी एक व्याख्यान देऊन त्यात प्रथमच हिंदुस्थानच्या बहिष्कृत वर्गाच्या अडचणी, त्यांची प्रांतवार संख्या, इत्यादी बाबींची व्यवस्थित मांडणी केली. ह्या लोकांच्या उद्धारासाठी जिवंत व्यक्तिगत पुढाकार आहे, असे मिशन तयार झाले पाहिजे व अशा मिशनने ख्रिस्ती मिशनऱ्यांप्रमाणे ह्या लोकांच्या जीवितामध्ये क्रांती नव्हे, तर विकास घडवून आणला पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर महात्मा ज्योतिराव फुले यांनी आधुनिक भारताच्या इतिहासात प्रथमच अस्पृश्यतेच्या दुष्ट प्रथेविरुद्ध उठाव केला होता. परंतु, तरीसुद्धा अस्पृश्यता समाजात घट्ट रुजलेली असल्याने विसाव्या शतकात ती भारतात सर्वत्र कठोर स्वरूपात प्रचलित होती. त्यामुळे अस्पृश्यांना मदत करण्याच्या उद्देशाने डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना ही आधुनिक भारताच्या सामाजिक इतिहासातील एक महत्त्वाची घटना मानली जाते. या संस्थेने दलितांना शिक्षण देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्यासाठी विविध प्रकारची तांत्रिक कौशल्ये शिकवली. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी या संस्थेच्या माध्यमातून दलितांसाठी मुंबईत चार शाळा उघडल्या आणि नवऱ्याने टाकून दिलेल्या किंवा एकाकी पडलेल्या दलित स्त्रियांसाठी 'निराश्रित सेवा सदन' उघडले. त्यांनी मुंबईबरोबरच भावनगर, अकोला, नागपूर, पुणे, इंदूर, हुबळी, धारवाड मद्रास, मंगळुरू इत्यादी ठिकाणी 'निराश्रित सेवा सदन'च्या १२ शाखादेखील उघडल्या. अस्पृश्यतेचा प्रश्न मांडण्यासाठी १९०९ आणि १९१२ मध्ये पुण्यात परिषदा आयोजित केल्या, तसेच १९१८ साली त्यांनी मुंबईत एक विशाल परिषद आयोजित केली होती.

मुंबईत झालेल्या परिषदेला एक वेगळेच महत्त्व होते. कारण, टिळकांनी स्वतः शिंदेंच्या विनंतीवरून त्यात हजेरी लावली, अस्पृश्यतेच्या प्रथेच्या विरोधात भाषणही केले. परंतु, वैयक्तिक जीवनात अस्पृश्यता पाळू नये, अशा ठरावावर स्वाक्षरी करण्यास त्यांनी नकार

दिला. टिळकांचा नकार हा त्यांच्या म्हणजेच एका राष्ट्रीय नेत्याच्या प्रतिगामी मानसिकतेचे प्रतीक होता. टिळकांचा हा नकार उच्चजातीय हितसंबंधांच्या सामूहिक मानसिकतेचे प्रातिनिधिक स्वरूप होते. टिळक हे सनातनी विचारांचे राष्ट्रवादी नेते असल्यामुळे त्यांनी त्याविरुद्ध बहुमत आपल्या बाजूने जमा केले. ही घटना एका अर्थाने ऐतिहासिक आहे. कारण, ती तत्कालीन राष्ट्रवादाच्या राजकीय स्वरूपावर लक्ष केंद्रित करते. अशा राष्ट्रवादाला पारंपरिक सनातनी धार्मिक व्यवस्था आणि उच्च जातींचे जातिव्यवस्थेने मिळालेले विशेषाधिकार टिकवून ठेवण्यात रस होता. दलितांच्या अस्मितेच्या मूळ प्रश्नाबाबत राष्ट्रवादी चळवळ कशी उदासीन होती, हे यातून ठळकपणे दिसून येते.

अस्पृश्यतानिवारण कार्याबरोबरच त्यांनी इतर स्वरूपाचे सामाजिक कार्यही केले. त्यांनी मुरळी प्रथेविरुद्ध आवाज उठविण्यासाठी मुंबईत एक संस्था स्थापन केली आणि तिच्या माध्यमातून १९११ साली एक मुरळी प्रतिबंधक परिषद भरवली. तरुण मुलींना मुरळी सोडण्याची प्रथा बंद करावी यासाठी त्यांनी भरपूर पर्यटन केले. तसेच महर्षी शिंदे यांनी स्त्रियांच्या प्रश्नांकडेदेखील आस्थेने पहिले आणि त्यांच्या उन्नतीसाठी कार्य केले. १९११ मध्ये पुणे म्युनिसिपालिटीने केवळ मुलांसाठीच सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना तयार केली होती. मुलींनाही मुलांप्रमाणेच सक्तीचे प्राथमिक शिक्षण असावे यासाठी टिळकांच्या विरोधात जाऊन त्यांनी चळवळ केली.

महर्षी शिंदे हे विवेकवादी असल्यामुळे त्यांनी अस्पृश्यतेच्या समस्येकडे विविकवादी दृष्टिकोनातूनच पाहिले; त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या इतर नेत्यांचे लक्ष सर्वप्रथम अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे वेधले. परिणामी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेपासून प्रथमच तिच्या ३२व्या अधिवेशनात कलकत्ता येथे डॉ. ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यतेच्या जघन्य प्रथेच्या निर्मूलनाचा ठराव मंजूर करण्यात आला. अर्थात, त्यापूर्वी सलग सात-आठ वर्षे त्यांनी यासाठी सातत्याने प्रयत्न केले होते. काँग्रेसने लोकांना दलितांशी मानवतेने वागण्याचे आणि अस्पृश्यतेसारख्या अनिष्ट प्रथांचे पालन न करण्याचे आवाहन केले. त्यानंतर काँग्रेसच्या ठिकठिकाणच्या प्रांतिक परिषदांमध्येही अशाच प्रकारचे ठराव पारित करण्यात आले. अस्पृश्यतानिवारण हा काँग्रेसच्या कार्याचा एक भाग झाला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यतानिवारणाचे कार्य संस्थात्मक प्रयत्नांच्याद्वारे पहिल्यांदाच अखिल भारतीय पातळीवर नेले. यामधून त्यांची अस्पृश्यतानिवारण आणि दलितउद्धाराची तळमळ व दूरदृष्टी दिसून येते.

दलितांची लष्करी सेवेत भरती व्हावी आणि ते आर्थिकदृष्ट्या मजबूत व्हावेत यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आग्रही होते. मात्र ब्रिटिश सरकारने दलितांची सैन्यभरती बंद केलेली होती, तेव्हा त्यांनी राज्यपालांना लष्करी दलात दलितांची भरती करण्याची विनंती केली आणि ती पहिले महायुद्ध सुरू असल्याने आणि भारतीय ब्रिटिश सैन्याचा युरोपमध्ये पराभव झाल्यामुळे १९१७ मध्ये मंजूर करण्यात आली. यामुळे प्रसिद्ध 'महार बटालियन' पुन्हा तयार करण्यात आली होती. त्यामुळे महर्षी शिंदे यांचे प्रयत्न फलदायी ठरले आणि दलितांच्या सैन्यभरतीचे त्यांचे प्रयत्न सत्यात उतरले.

महर्षी शिंदे दलितांच्या उद्धारासाठी अनेक बाजूंनी काम करत होते. दलितांच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत सुधारणांची आवश्यकता समजावून सांगण्यासाठी लेखन करत होते. परिषदा आयोजित करत होते आणि शाळांमधून काम करत होते. त्यांचा ''भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न या विषयावरचा प्रबंध १९३३ मध्ये प्रकाशित झाला. त्यांनी 'अ मिशन फॉर द डिप्रेस्ड क्लासेस- ए प्लीआ', 'बहिष्कृत भारत' यासह इतर अनेक लेख लिहून दलित आणि अस्पृश्यतेची दुष्ट प्रथा आणि त्यामुळे दलितांवर होणारा प्रचंड अन्याय याविषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्या मुक्तीसाठी आपापल्या परीने अथक प्रयत्न केले. अर्थात, या दोन महान व्यक्तिमत्त्वांमध्ये विचरसरणीचे काही मूलभूत मतभेद होते

आणि हे भिन्न दृष्टिकोन साऊथबरो समितीसमोर साक्ष देताना प्रकर्षाने समोर आले. त्या वेळी महर्षी शिंदे यांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघाला विरोध केला. परंतु, दलितांना प्रतिनिधी म्हणून सहकारी निवडण्याची सूचना केली. त्यांच्या या भूमिकेमुळे महाराष्ट्रात वाद निर्माण झाला आणि समाजातील विविध घटकांकडून तीव्र टीका झाली. सरकारने दलितांचे म्हणजे 'डिप्रेस्ड क्लासेस' चे प्रतिनिधी नियुक्त करू नयेत, तर त्यांना निवडून आलेल्या सदस्यांनीच निवडून द्यावे, अशी सूचना त्यांनी केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिंदेंच्या या उदासीन दृष्टिकोनावर टीका केली आणि त्यांच्या नैतिकतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तसेच, महर्षी शिंदे संचालित संस्था 'निराश्रित सेवा सदन' च्या नियामक मंडळात एकाही दलिताचा समावेश नव्हता, हा विरोधाभास त्यांनी निदर्शनास आणून दिला.

येथे, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा दृष्टीकोन लक्षात घेतला पाहिजे. त्यांच्या मते केवळ सहानुभूतीपेक्षा प्रत्यक्ष अनुभव जास्त महत्त्वाचा असून, दलित चळवळीचे नेतृत्व कोणत्याही गैरदलिताने करण्याच्या कल्पनेला त्यांचा विरोध होता. त्यांनी नेहमीच दलितांना स्वतःचे नेतृत्व स्वतःच करायला सांगितले आणि म्हणूनच १९२० साली माणगाव येथे भरलेल्या दलितांच्या परिषदेत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व स्वीकारण्याचे आवाहन सर्व दलितांना केले होते.

महर्षी शिंदे यांनी दलितांच्या मुक्तीसाठी आणि त्यांच्यासाठी शैक्षणिक संस्था उभ्या करणे यासारख्या उपक्रमांद्वारे, त्यांच्या लेखणीतून दलितांवर होणारे अनन्वित अत्याचार चव्हाट्यावर आणले आणि दलितमुक्तीसाठी निष्ठेने कार्य केले. अस्पृश्यतेचा प्रश्नही त्यांनी राष्ट्रीय स्तरावर उचलून धरला आणि सर्वतोपरी प्रयत्न केले. अस्पृश्यता या अनिष्ट प्रथेच्या निर्मूलनाचा ठराव मंजूर करून घेतला. १८८५ मध्ये स्थापनेनंतर पहिल्यांदाच काँग्रेसने अस्पृश्यतेच्या या महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष दिले होते. महर्षी शिंदे यांच्या सततच्या मागणीचा हा परिणाम होता. पण, त्यांची दलित प्रश्नाबाबतची धारणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांइतकी स्पष्ट नव्हती आणि त्यामुळे त्यांना दलितांकडून तीव्र टीकेला सामोरे जावे लागले.

परंतु, आधुनिक भारताचा इतिहास त्यांना दलितांचे मुक्तिदाता म्हणून स्मरणात ठेवेल आणि त्या दिशेने त्यांनी केलेले कार्यही अत्यंत महत्त्वाचे होते. त्यांनी अस्पृश्यता आणि 'मुरळी' सारख्या वाईट प्रथानिर्मूलनासाठी कठोर परिश्रम केले. या प्रथेनुसार दलितांना त्यांच्या मुलींना हिंदू धर्मातील एक महत्त्वाचे दैवत, खंडोबाच्या नावावर समाजसेवेसाठी दान करण्यास भाग पाडले जात असे. पण दलितांच्या समस्यांचे भान दलितांनाही नीटपणे आलेले नव्हते. मात्र, त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखा महान नेता लाभला आणि त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून आणि सतत अभ्यासपूर्ण विचारांनी दलितांना सामाजिक न्याय मिळवून दिला.

महाराष्ट्रात अशा अनेक समाजसुधारकांची ब्राह्मणेतर आघाडी समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी महत्त्वाची ठरली, असे म्हटले पाहिजे. महर्षी विठ्ठल शिंदे यांनी दलितांवर होणारे अन्याय, अत्याचार याच्याविरुद्ध सातत्याने आवाज उठवला आणि त्यापासून मुक्तता मिळवून देण्यासाठी अखंड प्रयत्न केले. त्यांनी दलितांच्या उद्धारासाठी आपले आयुष्य वेचले. स्वत: दलित वसतीमध्ये जाऊन वास्तव्य केले. दलित मुक्तीचे प्रश्न नेहमीच त्यांच्या कार्यात अग्रभागी राहिले आणि त्यांना राजकीय-सामाजिक-आर्थिक न्याय मिळावा यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. अस्पृश्यतानिवारणाचे कार्य हा महर्षी शिंदे यांच्या जीवनकार्याचा एक महत्त्वाचा भाग होता. मानवी जीवनाला कलंकभूत असणारा जातिभेद नष्ट व्हावा, यासाठी त्यांनी आयुष्यभर ध्यास घेतला होता.

■